# हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मध्ये कंत्राटी वैद्यकिय अधिकारी MBBS, स्टाफ नर्स, MPW-Male ची कंत्राटी तत्वावर पदभरतीकरीता जाहीरात

## सन २०२५-२६

हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यक्रमांतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांतर्गत खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर खालील रिक्त पदांसाठी पदभरती घेण्याकरीता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | प्रोग्रामचे नांव | मंजुर पदाचे नाव | मंजुर पदांची संख्या | रिक्त पदांची संख्या | रिक्त पदस्थापनेचे ठिकाण | प्रवर्ग | शेक्षणिक पात्रता | वय मर्यादा | दरमहा एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | HBT Apala Dawakhana | Medical Officer MBBS | 24 | 12 | समितीच्या निर्णयानुसार वेळोवेळी रिक्त होणाऱ्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल. | ST-2, NT-D-1, OBC-1, SEBC-2, EWS-2, Open-4 | MBBS Registered to Maharashtra Medical Council | ४३ वर्ष मागासवर्गीय प्रवर्गासाठी/ ३८ वर्ष खुला प्रवर्ग तथा MBBS यांची वयोमर्यादा ७० वर्ष | Rs. 60,000/- |
| २ | HBT Apala Dawakhana | Staff Nurse | 24 | 06 | समितीच्या निर्णयानुसार वेळोवेळी रिक्त होणाऱ्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल. | ST-1, NT-B-1, NT-C-1, NT-D-1, OBC-2, | 1. GNM & Registration from Maharashtra Nursing Council 2.B.Sc Nursing | ४३ वर्ष मागासवर्गीय प्रवर्गासाठी/ ३८ वर्ष खुला प्रवर्ग | Rs. 20,000/- |
| ३ | HBT Apala Dawakhana | MPW-Male | 24 | 08 | समितीच्या निर्णयानुसार वेळोवेळी रिक्त होणाऱ्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल. | ST-1, VJ-A- 1, NT-B-1, NT-C-1, NT-D-1, OBC-3, | १.विज्ञान शाखेतुन उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य घोषित केलेली इतर कोणतीही परिक्षा उत्तीर्ण. २.विभागाचा आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केन्द्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडुन आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकिय मुलभुत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक | ४३ वर्ष मागासवर्गीय प्रवर्गासाठी/ ३८ वर्ष खुला प्रवर्ग | Rs. 18,000/- |

Mahabharti.in

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | | |
| एकूण रिक्त पदे - | | | 72 | 26 | | | | | |

**<u>महत्वाचा सुचना-</u>**

१. अनु क्रमांक १ मधील वैद्यकिय अधिकारी **MBBS** यांची पदे प्रत्यक्ष मुलाखत **(Walk in Interview)** व्दारे भरावयाची आहे.

> वैद्यकिय अधिकारी **MBBS** यांची दिनांक ०६/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष मुलाखत **(Walk in Interview)** घेण्यात येईल. तरी अर्जदारांनी नमुद दिनांकरोजी सकाळी १० ते १२ पर्यंत संपुर्ण मुळ शैक्षणिक कागदपत्रासह व संच झेरॉक्स कॉपीसह राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नागपूर कार्यालयात न चुकता वेळेवर उपस्थित राहावे.

<u>अर्ज सादर करण्याची तारीख</u>:- अनु क्र. २ व ३ पदांकरिता (ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने)

दि. २५/०४/२०२५ पासुन ते दि. ०८/०५/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० पर्यत.

<u>अर्ज स्विकारण्याचे ठिकाण</u> :- राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन, नागपूर

२. सविस्तर जाहिरात अटी, शर्ती तथा अर्जासह **www.nagpurzp.com** वर उपलब्ध आहे. सदर जाहीरातीबाबत पात्र/अपात्र उमेदवारांची मेरीट लिस्ट व पदभरतीबाबत वारंवार प्रसिध्द होणाऱ्या सुचना हया कार्यालयाच्या **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल. उमेदवारांना पदभरती बाबत कोणतीही सुचना दुरध्वनी व्दारे कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

३. अर्ज सादर करण्याची पध्दत:- सर्व उमेदवारांनी खालील दिलेल्या **Link** वर क्लिक करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे अनिवार्य राहील. त्याचप्रमाणे उमेदवारांनी **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर उपलब्ध अर्जाचा नमुना डाऊनलोड करावे व सदर अर्ज भरुन त्याला खालील दिलेले आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावे व सदर अर्ज हा कार्यालयास जमा करणे अनिवार्य राहील. उमेदवारांनी ऑनलाईन तसेच ऑफलाईन या दोनही पध्दतीने अर्ज भरणे अनिवार्य राहील अन्यथा सदर उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

अर्ज सादर करण्याची **Link-**

| | |
|---|---|
| **HBT MPW-Male** उमेदवारांनी खालील दिलेल्या लिंक मध्ये जाऊन ऑनलाईन अर्ज करावे | **HBT Staff Nurse** उमेदवारांनी खालील दिलेल्या लिंक मध्ये जाऊन ऑनलाईन अर्ज करावे |
| **https://forms.gle/AA5o5sCEigUjUwVz5** | **https://forms.gle/EruLEi6czsMkdaWR6** |

४. आवश्यक कागदपत्रे :- खालील कागपत्रांची मुळ प्रतीची छायांकिंत प्रत स्वक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१) पदवी /पदविका प्रमाणपत्रे २) गुणपत्रिका (सर्व) ३) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे ४) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला ५) शासकिय/ निमशासकिय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ६) पासपोर्ट आकाराचा फोटो ७) वैद्यकिय अधिकारी/स्टाफ नर्स पदाकरिता रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ८) **RTGS/NEFT/IMPS/UPI/DD** व्दारे अर्जशुल्काचा भरणा केल्याची पावती अथवा डिमांड ड्राफ. ९) लहान कुटुंब असल्याबाबतचे प्रमाणपत्र १०) अन क्र. १ ते ९ पर्यतचे सर्व दस्तऐवज क्रमवारीत जोडावेत.

५. पदभरती प्रक्रिया सुरु होऊन संपुष्टात येईस्तोवर सर्व टप्प्यावर माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची जबाबदारी उमेदवारांची राहील.

Mahabharti.in

**अटी व शर्ती**

१. वरील सर्व पदे हि **निव्वळ कंत्राटी स्वरुपाची** असुन त्यांचा कालावधी दि. २९/०६/२०२५ पर्यंत राहील. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे परंतू सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.

२. सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. म्हणून अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३. सदरील पदे राष्ट्रीय आरोग्य अभियानाशी/राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाशी संबंधित नाहीत, त्यामुळे भविष्यात सदरील योजना/ कार्यक्रम बंद पडल्यास अथवा पदांना मंजुरी न मिळाल्यास त्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये/राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामध्ये समावुन घेण्याचा दावा करता येणार नाही.

४. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा, अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

५. ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती राज्य शासनाच्या नियमित मंजूर रिक्त पदावर करण्यात आली आहे. अशा कर्मचाऱ्यांची सेवा सदर पद रिक्त असेंपर्यत सुरु राहील. नियमित पदे भरले गेल्यास सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा आपोआप तात्काळ संपुष्ठात येईल.

६. अभियांनातर्गत कार्यरत ज्या कर्मचाऱ्यांचे मानधन रुपये १५,०००/- व रु. १५,०००/- पेक्षा कमी असले तर त्या कर्मचाऱ्यांना ईपीएफ सुविधा लागू करण्यात येईल. व त्याकरीता राज्य कार्यालयाव्दारे निर्गमीत करण्यात आलेल्या परिपत्रक व पत्रानुसार कार्यवाही करण्यात येईल.

७. अभियान अंतर्गत विविध स्तरावर पदभरती करण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असून ही योजना संपुष्ठात येईपर्यत या पैकी जे अगोदर घेडेल तो पर्यत करण्यात येत आहे.

८. जिल्हा/परिमंडळ स्तरावरुन नियुक्त करण्यात येणाऱ्या व त्यांचे नियुक्ती/पुनर्नियुक्ती अधिकार जिल्हा/परिमंडळस्तरावर देण्यात आलेले आहेत. अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कामकाज असमाधानकारक असल्यास कारणे दाखवा नाटीस/ज्ञापण बजावण्यात येईल. संबंधितांनी विहित मुदतीत खुलासा सादर केल्या नंतर खुलासा असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार स्वतःचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. तद्नंतर असमाधानकारक कामकाजाबाबत खात्री केल्यानंतरच सेवा समाप्तीचे आदेश काढण्यात येईल. सेवा समाप्ती आदेशात त्यांच्या वर लावण्यात आलेल्या दोषारोपाचे व ते दोषारोप सिध्द होत असल्याचा सविस्तर उल्लेख करण्यात येईल.

९. कर्मचाऱ्या संदर्भात आर्थिक अनियमितता अथवा अन्य गंभीर बाबी निदर्शनास आल्यास कारणे दाखवा नोटीस/ज्ञापण बजावण्यात येईल. कर्मचाऱ्याने विहित मुदतीत खुलासा सादर केल्यानंतर खुलासा असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार स्वतःचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. अंतमतः कर्मचारी दोषी असल्यास सेवा समाप्तीचा प्रस्ताव राज्य कार्यालयास सादर करण्यात येईल.

१०. लहान कुटुंब अट ही दिनांक २३/०७/२०२० पासून लागू करण्यात येत असून, दिनांक २३/०७/२०२० पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कंत्राटी पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

११. उपरोक्त सर्व पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

१२. सदर रिक्त पदांच्या संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवू शकतो.

१३. उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधील नमूद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

१४. संबंधित पदाकरीता नोंदणी नंतर पात्र, अपात्र यादी प्रसिध्द दिनांकास कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.nagpurzp.com) प्रसिध्द करण्यात येईल. त्यासंबंधी आक्षेप असल्यास वरील नमूद प्रमाणे कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात सादर करणे गरजेचे राहील व तद्नंतर निराकरण केले जाईल त्यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

१५. अर्जदाराला सोईनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलवून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१६. उपरोक्त संबंधीत पदाकरीता तत्सम कॉन्सीलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारांस अपात्र ठरवल्या जाईल.

Mahabharti.in

१७. एकापेक्षा जास्त ठिकाणी कार्यरत असल्यास उमेदवाराने अर्ज करण्यात येवू नये. निवड उपरांत तत्सम बाब कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१८. पदभरती प्रक्रियेस कार्यालयात उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१९. अ.क्र. १ वैद्यकिय अधिकारी MBBS पदाकरिता मेरीट लिस्ट तयार करतांना खालीलप्रमाणे गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

A) Subject Knowledge (10)
B) Research & Academic Knowledge (10)
C) Leadership Quality (10)
D) Administrative Abilities (10)
E) Experience (10)
F) For Govt. Experience-2 marks for one year
G) For Private Experience-1 marks for one year

Total Experience -10 marks Maximum **एकुण गुण- ५०**

सदर पदाकरिता पात्र उमेदवारांची थेट मुलाखत घेऊन सर्व उमेदवारांचे गुण एकत्र करुन मेरीटलिस्ट तयार करुन निवड करण्यात येईल.

२०. **गुणांकन पध्दती अनु. क्र. २ व ३ पदांकरिता** - खालील तक्त्यात नमूद गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया करण्यात येईल.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक (Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे proportion =६०X५०/१००= ३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | **अधिकतम २० गुण द्यावेत.** मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१ Staff Nurse पदाची आवश्यक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षाचे ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proportion = ६०X२०/१००= १२ गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरीता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | **एकूण १०० गुण** |

अ) यानुसार सर्व उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

ब) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवाराचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

क) ज्या पदाकरीता Skill Assessment Protocol नुसार कौशल्य चाचणी घेणे अनिवार्य करण्यात आली आहे. त्या पदांकरीता पात्र उमेदवारांची नियुक्ती आदेश देण्यापूर्वी कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

२१. मा. सहाय्यक आयुक्त यांच्या बिंदुनामावलीप्रमाणे आरक्षणामध्ये बदल झाल्यास उमेदवारांना कोणतीही पुर्व सुचना न देता कमी करण्यात येईल.

Mahabharti.in

२२. **मागासर्वीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु. १५०/- चे बॅक ऑफ महाराष्ट्र बॅकेचे जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर खाते क्र. 60521839854, IFSC Code – MAHB0001321 वर RTGS/NEFT/IMPS/UPI/DD व्दारे भरणा करुन पावती फॉर्म सोबत जोडावे किंवा कोणत्याही Nationalised बॅकेचा डिमांड ड्राफट जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर यांचे नावाने जोडण्यात यावा.**

२३. संपूर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल.

२४. सदर पदभरतीचे अर्ज पदभरती प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ३ महिन्यापर्यंत जपुन ठेवण्यात येतील. ३ महिन्यानंतर सदर अर्ज हे नष्ठ करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२५. भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद् करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, निवड समिती, रा.आ.अ. नागपूर यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

स्वा-
सदस्य सचिव
निवड समिती तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर

स्वा-
अध्यक्ष
निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर

Mahabharti.in